# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक
दिनांक:- २८/०२/२०१७

## *सी.आर.पी.एफ. च्या ११३ बटालीयनच्या वतीने पावरवेल गावातील नागरिकांनी सौर दिव्यांचे वाटप*

उपविभाग पेंढरी अंतर्गत येणाऱ्या पोलीस मदत केंद्र गोडलवाही हद्दितील मौजा पावरवेल या गावात नागरिकांनी विजेच्या प्रश्नाबाबत वारंवार पोलीस अधिकाऱ्यांकडे समस्या मांडल्या होत्या. त्यांच्या या अंधाऱ्या जिवनाला प्रकाशाकडे नेण्यासाठी सी.आर.पी.एफ. च्या ११३ बटालीयनच्या वतीने सौर दिव्यांचे वाटप करण्यात आले.

कमांन्डट एन. शिवशंकर यांच्या मार्गदर्शनाखाली घेतलेल्या या कार्यक्रमात सहा. कमांन्डट विकास कुंभारे, उपनिरीक्षक हरि सिंह, पोउपनि सरडे, गोटे, खाडे गावातील प्रतिष्ठीत व इतर नागरिक उपस्थित होते. या कार्यक्रमात पोलीस प्रशासनातर्फे राबवणाऱ्या विविध योजनांची माहिती गावातील नागरिकांना देण्यात आली. व नागरिकांनी सुध्दा जास्तीत-जास्त पोलीस प्रशासनाला सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.


CIVIC ACTION PROGRAMME
A/113 BN CR